





# संरक्षणशास्त्र

## इयत्ता बारावी









# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास – २११६ (प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# संरक्षणशास्त्र

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

E5U4E1

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२०**
**पुनर्मुद्रण : २०२१**

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**संरक्षणशास्त्र विषय समिती**

प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
ब्रिगेडीअर एस. जी. गोखले (निवृत्त), सदस्य
कर्नल डॉ. प्रमोदन मराठे (निवृत्त), सदस्य
डॉ. विजय जाधव, सदस्य
डॉ. शांताराम बडगुजर, सदस्य
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**संरक्षणशास्त्र अभ्यास गट**

श्री. नंदकुमार बोरसे
श्री. विवेकानंद कदम
डॉ. संजय ढाके
प्रा. होमसिंग पाटील
श्री. वैजनाथ काळे
डॉ. सोमनाथ राऊत
डॉ. केशव पाटील
श्री. विक्रांत कावळे
प्रा. गिरिश गावित
प्रा. भारतभूषण बालबुद्धे

**प्रमुख संयोजक**

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी,
आरोग्य व शारीरिक शिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**नकाशाकार**
श्री. रविकिरण जाधव
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**मुखपृष्ठ व सजावट**
श्री. रमेश माळगे

**अक्षरजुळवणी**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद**
७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**निर्मिती**
**श्री. सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. लिलाधर आत्राम**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

इयत्ता बारावीचे संरक्षणशास्त्र विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीचा आशय अभ्यासाच्या दृष्टीने एकत्रित स्वरूपाचा आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. इयत्ता अकरावीमध्ये तुम्ही संरक्षणशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पना, भूराजकीय भूगोल, लष्करी इतिहास, संरक्षण अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना यांचा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अभ्यास केला. त्यामागे इयत्ता बारावीमध्ये राष्ट्रीय सुरक्षेस असलेली आव्हाने आणि त्यासाठी करावयाचे प्रयत्न समजून घेण्यासाठीची बैठक निर्माण करणे हा हेतू होता.

इयत्ता बारावीमध्ये भारताच्या संदर्भातील राष्ट्रीय सुरक्षेच्या विविध पैलूंचा अभ्यास करणार आहोत. पहिल्या प्रकरणात भारताच्या लष्करी, राजकीय आणि राजनयिक, आर्थिक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आणि अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षा या विविध पैलूंना समजावून घेण्यासाठीचा आराखडा दिलेला आहे.

उर्वरित प्रकरणांमध्ये भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेल्या समस्यांसंबंधी जगातील विविध भूभाग व देश यांच्याशी भारताचे असलेले संबंध यांचा परामर्श घेतला आहे. शेवटच्या प्रकरणात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शेजारील देशांशी झालेल्या विविध युध्दांची माहिती दिलेली आहे.

संरक्षणक्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टिने आवश्यक त्या बाबी पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. त्याचा तुम्हांला निश्चितच उपयोग होईल. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना सुचवलेले उपक्रम, क्षेत्रभेटी, मुलाखती, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, विविध माध्यमाचे साहाय्य, गटचर्चा, सादरीकरण याबरोबरच शिक्षक आणि पालकांची मदत घेऊन हा विषय अधिक सखोलपणे समजून घ्याल ही अपेक्षा आहे.

पाठ्यपुस्तक वाचताना, समजून घेताना, तुम्हांला आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न जरूर कळवा.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी

इयत्ता ११ वी आणि १२ वी संरक्षणशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम एकत्रित विचार केला पाहिजे. इयत्ता ११ वीमध्ये संरक्षणशास्त्र विषयाच्या विविध पैलूंचा अभ्यास आहे. त्यात संरक्षणशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पना, भूराजकीय भूगोल, लष्करी इतिहास, संरक्षण अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान आणि भारताची राष्ट्रीय संरक्षण संघटना यांच्याशी असलेल्या संबंधाचा अभ्यास आहे. तर, इयत्ता १२ वीमध्ये ११ वीतील विविध संकल्पनांची उपयोजनात्मक मांडणी आहे.

पहिल्या प्रकरणात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयक प्रश्नांचा अंतर्भाव आहे. भारताचा राष्ट्रीय सुरक्षेकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यात स्पष्ट केला आहे. त्यानंतर विविध काळातील आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये भारतासमोरील सुरक्षेला असलेली आव्हाने आणि भारताची धोरणे यांचा आढावा घेतला आहे. थोडक्यात, नंतरच्या प्रकरणांसाठीची पार्श्वभूमी या प्रकरणात मांडली आहे.

दुसरे प्रकरण भारताचे शेजारी पाकिस्तान व चीन या दोन देशांपासून भारताच्या सुरक्षेसंबंधित प्रश्नांवर प्रकाश टाकते.

तिसऱ्या प्रकरणात आशिया खंडातील इतर देशांशी असलेल्या संबंधांबाबत मांडणी केलेली आहे. या प्रकरणाचा पहिला भाग दक्षिण आशियातील नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्याशी संबंधित आहे. दुसरा आणि तिसरा भाग अनुक्रमे पश्चिम व पूर्व आशियायी देशांशी असलेल्या संबंधांबाबत आहे.

प्रकरण चौथे हे भारताच्या आण्विक, अंतराळ आणि सागरी सुरक्षेच्या समस्यांबाबत आहे. त्यात भारताच्या आण्विक धोरणाची उत्क्रांती, अंतराळ कार्यक्रम आणि सागरी सुरक्षेसंबंधीची आव्हाने इत्यादींचा समावेश आहे.

प्रकरण पाचमध्ये भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांचा ऊहापोह आहे. यात चार प्रमुख आव्हानांची सविस्तर मांडणी आहे. त्यात देशांतर्गत दहशतवाद, जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद, नक्षलवाद, उत्तर-पूर्व राज्यांमधील बंडखोरी आणि काही भागातील डावा उग्रवाद यांचा समावेश आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने अनेक युध्द अनुभवली आहेत.

प्रकरण सहाव्यामध्ये त्या अनुषंगाने १९४७ नंतरच्या भारताने लढलेल्या युध्दांचा परिचय दिलेला आहे; त्यात-

(i) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९४७-४८)
(ii) जुनागड मुक्ती संग्राम (ऑक्टोबर १९४७)
(iii) हैद्राबाद मुक्ती संग्राम (सप्टेंबर १९४८)
(iv) गोवा, दीव आणि दमण मुक्ती संग्राम (डिसेंबर १९६१)
(v) भारत-चीन संघर्ष (१९६२)
(vi) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९६५)
(vii) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९७१)
(viii) कारगिल संघर्ष पाकिस्तानसोबत (१९९९)

या पाठ्यपुस्तकाद्वारे तुम्हांला भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या समस्यांची व्यापक माहिती होईल. या पुस्तकात अनेक उपक्रम आणि नकाशे दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहलीसाठी काही लष्करी आस्थापनांना दिलेल्या भेटी या स्वागतार्ह असतील. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने उपयुक्त वृत्तपत्रातील बातम्यांच्या वाचनासाठी तसेच दूरदर्शनवरील बातम्या पाहण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

इयत्ता ११ वी व १२ वी संरक्षणशास्त्र पुस्तकाच्या संयुक्त अध्ययनातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नांमधील गुंतागुंत समजण्यास मदत होईल, असा आम्हांस विश्वास/खात्री आहे. आपल्या भावी शैक्षणिक जीवनासाठीही हे पुस्तक उपयोगी ठरेल. सुरक्षेसंबंधीच्या विविध क्षेत्रात शैक्षणिक संधीचीही माहिती या पुस्तकातून मिळेल.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा.

संरक्षणशास्त्र विषय समिती व अभ्यासगट
पाठ्यपुस्तक मंडळ

## संरक्षणशास्त्रविषयक क्षमता विधाने : इयत्ता १२ वी

१. दुसऱ्या महायुद्धानंतरची आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि स्वातंत्र्यानंतर भारताला सामोरे जावी लागलेली संरक्षणविषयक आव्हाने समजून घेणे

२. पाकिस्तान आणि चीन या शेजारी देशांशी भारताचे असलेले वाद आणि त्यातून उभ्या राहिलेल्या संरक्षणविषयक आव्हानांचे स्वरूप समजून घेणे व त्यांचे विश्लेषण करणे

३. दक्षिण आशियातील लहान देशांसंबंधीचे भारताचे संरक्षणविषयक धोरण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आव्हानांचा भारत कसा सामना करतो याचा अभ्यास करणे

४. पश्चिम आणि पूर्व आशियातील देशांसमवेत भारताने संरक्षणविषयक संबंध कसे विकसित केले ही प्रक्रिया समजून घेणे

५. आण्विक आणि अवकाश क्षेत्रांतील तंत्रज्ञानाच्या विकासाचा अभ्यास करणे आणि भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर त्यांचा होणारा परिणाम समजून घेणे

६. भारताच्या सागरी धोरणाचे विश्लेषण करणे आणि हिंदी महासागर क्षेत्रातील संरक्षणविषयक आव्हानांचा सामना करताना भारताने वापरलेल्या पद्धतीचा अभ्यास करणे

७. दहशतवाद व नक्षलवादाच्या समस्या अभ्यासण्याबरोबरच जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारतात सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाच्या विशेष संदर्भात भारतापुढील अंतर्गत संरक्षणविषयक आव्हानांचे योग्य आकलन करून घेणे

८. अंतर्गत संरक्षणाचे प्रश्न सोडविण्यासाठी भारताने स्वीकारलेल्या पद्धती व दृष्टिकोनाचे विश्लेषण करणे

९. स्वातंत्र्यानंतर भारताला करावे लागलेले सशस्त्र संघर्ष, त्यांची कारणे आणि भारतीय सैन्यदलांनी या संघर्षांमध्ये बजावलेली भूमिका यांचा समग्र अभ्यास करणे


१०. भूगोल आणि व्यूहनीती यांचे परस्परसंबंध समजून घेण्यासाठी विविध प्रादेशिक विभागांचे नकाशे अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे

**S.O.I. Note :**
The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2020. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources. (9) The administrative headquarter of Telangana and Andrapradesh are at Hyderabad. (10) The administrative boundaries of J & K UT and Ladakh UT shown here are yet to be authenticated by concerned authorities.

# WORLD - POLITICAL (MAJOR COUNTRIES)



# आशिया खंडातील प्रमुख देश



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १ | भारताची सुरक्षा: संकल्पनात्मक चौकट | १ |
| २ | भारताचे शेजारी: पाकिस्तान आणि चीन | १५ |
| ३ | भारत आणि आशिया | २५ |
| ४. | भारताची आण्विक, अवकाश आणि सागरी धोरणे | ४० |
| ५ | अंतर्गत सुरक्षा | ५१ |
| ६ | भारताचे स्वातंत्र्योत्तर सशस्त्र संघर्ष | ६६ |
| • | परिशिष्ट अ : संक्षिप्त रूपे<br>ब : संकेतस्थळे | ७९ |